ePaper

दीनानाथ मंगेशकर रुग्णालयाच्या मनमानीमुळे महिलेचा मृत्यू, फडणवीसांनी घेतला मोठा निर्णय

| वर्ष - 8 | अंक - 254 | UDYAM-MH-26-0158827 |

# महाईन्यूज ™

www.mahaenews.com | शनिवार, दि. 5 एप्रिल 2025 | पुणे, पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!



### आतील पानांत


- विघ्नेश पुथूरने सार्थ ठरवला विश्वास
- लखनौने मुंबईला दिला पराभवाचा दणका
- अमेरिकेकडून व्यापार नियमांचे उल्लंघन
- पियुष गोयल यांनी स्टार्टअप्सना फटकारले


## गर्भवती महिलेच्या मृत्यूचे प्रकरण पेटले

# ‘दीनानाथ’ मध्ये राडा!

## विविध संघटनांची ‘दीनानाथ’ मध्ये संतप्त आंदोलने

। पुणे / बीड । प्रतिनिधी । महाईन्यूज

**‘दीनानाथ मंगेशकर हॉस्पिटल’ च्या मुजोरीविरुद्ध गुरुवारी विविध संघटनांनी हॉस्पिटलसमोर संतप्त निदर्शने आणि आंदोलने केली. पैशाअभावी गर्भवती महिलेवर उपचार करण्यास हॉस्पिटलने नकार दिल्याचा आरोप झाला होता. त्यानंतर तिचा मृत्यूही झाला. आरोप-प्रत्यारोपांच्या फैरी दिवसभर झडत होत्या. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या संपूर्ण घटनेच्या चौकशीचे आदेश दिले आहेत. यातील दोषींवर कडक कारवाई करण्यात येईल, असेही त्यांनी स्पष्ट केले आहे. दरम्यान, या सर्व घटनाक्रमाबाबत हॉस्पिटलच्या प्रशासनाने पत्रक प्रसिद्ध केले असून सविस्तर खुलासा केला आहे.**



**मुख्यमंत्र्यांनी दिले चौकशीचे आदेश, दीनानाथ प्रशासनाकडून खुलासा !**

भाजपाचे आमदार अमित गोरखे यांचे स्वीय सहाय्यक सुशांत भिसे यांची गर्भवती पत्नी तनिषा यांच्यावर उपचार नाकारल्याचे प्रसिद्ध झाले असून दुसरीकडे त्यांची प्रसुती व्यवस्थित होऊन जुळे झाले. पण, दुर्दैवाने तनिषा या मृत्यूमुखी पडल्या. या घटनेचे संतप्त पडसाद दीनानाथ हॉस्पिटलच्या आवारात पाहायला मिळाले.

### कुणी चिल्लर फेकली, कुणी नोटा फेकल्या..

तनिषा भिसे या गर्भवती महिलेला दीनानाथ हॉस्पिटलने उपचारासाठी दाखल करून घेण्यास नकार दिला, असा आरोप होत आहे. त्यांच्याकडे दहा लाख रुपयांची मागणी करण्यात आली. प्रत्यक्षात, त्या तीन लाख रुपये भरण्यास तयार देखील होत्या. पण, हॉस्पिटलचे प्रशासन दहा लाखावर अडून बसले आणि पुढील सर्व दुर्दैवी प्रकार घडला. हे हॉस्पिटल चॅरिटेबल ट्रस्टचे असताना सुद्धा रुग्णांच्या जीवाशी खेळ केला जात असल्याचा आरोप करून विविध संघटना आंदोलनासाठी हॉस्पिटलमध्ये घुसल्या. दोषींवर त्वरित कारवाई करावी, हीच प्रत्येकाची मागणी होती. त्यातूनच संतप्त निदर्शने झाली. हे हॉस्पिटल पैशासाठी हपापलेले आहे, असा आरोप करून काही संघटनांनी हॉस्पिटलच्या दिशेने चिल्लर फेकली, तर काहींनी नोटा उडवल्या. काही संघटनांनी हॉस्पिटल च्या मुख्य फलकाला काळेही फासले.

### शिवसेनेच्या दोन्ही गटांकडून गंभीर आरोप

शिवसेनेचे दोन्ही गट आक्रमक झाले आणि त्यांनी हॉस्पिटलच्या प्रशासनावर त्यांनी गंभीर आरोप केले आहेत. दोन्ही गटांचे कार्यकर्ते हॉस्पिटलच्या बाहेर सकाळपासून गर्दी करून होते. घोषणांमुळे वातावरण चांगलेच पेटले आणि कार्यकर्त्यांनी पैशाची उधळण केली.

### पोलिसांचा हस्तक्षेप, कार्यकर्त्यांना रोखले

हॉस्पिटलभोवती सकाळपासूनच पोलिसांनी गराडा घातला होता. हे संतप्त आंदोलक हॉस्पिटलमध्ये घुसण्याचा प्रयत्न करत असतानाच पोलिसांनी त्यांना रोखले, त्यामुळे पुढील अनर्थ टळला.

### पतीत पावन संघटनेची तीव्र प्रतिक्रिया

पतीत पावन संघटनेच्या कार्यकर्त्यांनी हॉस्पिटलपुढे जोरदार घोषणाबाजी केली आणि नंतर हॉस्पिटलच्या मुख्य फलकाला काळे फसून त्यांनी निषेध व्यक्त केला.

### युवा काँग्रेसही आक्रमक..

या घटनेचा निषेध करण्यासाठी युवा काँग्रेसचे कार्यकर्ते हॉस्पिटलच्या आवारात जमा झाले आणि त्यांनी जोरदार टीका करीत तीव्र संताप व्यक्त केला.

### आरोग्यमंत्री सक्रिय, चौकशीचे आदेश

या घटनेनंतर राज्याचे आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर यांनीही चौकशीचे आदेश दिले असून त्यांनी एक समिती नेमण्यात आल्याचे सांगितले. सर्व माहिती आपण सरकारला दिली असून लवकरच अहवाल येईल आणि तो आल्यानंतर हॉस्पिटलची भूमिका स्पष्ट होईल, असे त्यांनी सांगितले.

### हॉस्पिटलकडून अहवाल सादर

या संतप्त प्रकारानंतर दीनानाथ हॉस्पिटलने नेमलेल्या चौकशी समितीचा अहवाल सादर झाला आणि त्यात चार निष्कर्ष मांडण्यात आले.

### हॉस्पिटलला एक रुपये भाड्याने जमीन..

या घटनेमुळे संपूर्ण महाराष्ट्र हादरून गेला असून दिवसभर विविध नेते आणि संघटनांनी संताप व्यक्त केला आहे. या दीनानाथ मंगेशकर हॉस्पिटलला राज्य सरकारने नाममात्र एक रुपये दराने ही जमीन भाडेतत्त्वावर दिल्याचे स्पष्ट झाले आहे. फक्त पैशाची हाव असणाऱ्या या मस्तवाल हॉस्पिटलला ७९५ चौरस मीटर जमीन एवढ्या कमी दरात देण्याची गरज काय? असा सवाल सामाजिक कार्यकर्ते विजय कुंभार यांनी केला असून त्यांनी सरकारवर सडकून टीका केली आहे. बाजारभावानुसार या जमिनीची किंमत किमान दहा कोटी रुपये असल्याचा दावा होत आहे. शरद पवार गटाचे अध्यक्ष जयंत पाटील यांनी तीव्र नाराजी व्यक्त करून राज्यातील सर्वच धर्मादाय रुग्णालयांची चौकशी करावी, अशी मागणी केली आहे. काँग्रेसचे ज्येष्ठ नेते विजय वडेट्टीवार यांनी संतापाच्या भरात स्पष्ट केले, की मंगेशकर हॉस्पिटलला त्वरित टाळे ठोकावे आणि तेथील लुटारू आणि डाकूंच्या टोळीचा योग्य तो समाचार घ्यावा.

# दीनानाथ मंगेशकर रुग्णालयाची मुजोरी!

## चंद्रशेखर बावनकुळे : भिसे यांच्या उपचारांसाठी कुटुंबियांकडून 10 लाखांची मागणी

। पुणे ।
महाईन्यूज । प्रतिनिधी।

**पुण्यात दीनानाथ मंगेशकर रुग्णालयाच्या हलगर्जीपणामुळे भाजप आमदार अमित गोरखे यांचे स्वीय सहाय्यक सुशांत भिसे यांच्या पत्नी तनीशा भिसे यांचा मृत्यू झाल्याचा आरोप करण्यात आला आहे. यावर भाजप प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे प्रतिक्रिया दिली आहे.हलगर्जीपणा करणाऱ्या दीनानाथ मंगेशकर रुग्णालयावर शंभर टक्के कारवाई केली जाईल असं आश्वासन त्यांनी दिलं आहे.**




रुग्णालयात एक प्रकारची मुजोरी सुरू आहे.ही मुघलशाही आहे. याबाबत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि अजित पवारांनी दखल घेतली आहे. गर्भवती तनीषा भिसे यांच्या मृत्यू प्रकरणात कुणालाही सोडलं जाणार नाही. असं स्पष्ट मत चंद्रशेखर बावनकुळे यांनी व्यक्त केलं आहे. ते पुण्यात प्रसारमाध्यमांशी बोलत होते. चंद्रशेखर बावनकुळे म्हणाले, रुग्णालयाकडून मोठी चूक झाली आहे. अशा चुकीला माफी नाही. सरकार यावर योग्य कारवाई करणार आहे. सर्वसामान्य माणसाला अशा पद्धतीने उपचार न देणे ही एक प्रकारची मुजोरी आहे. ही मुघलशाही आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, अजित पवार यांनी दखल घेतलेली आहे. आम्ही कुणालाही सोडणार नाहीत. कठोर कारवाई करणार आहोत. घटनेमुळे नागरिकांमध्ये प्रचंड संताप आहे.पुढे ते म्हणाले, जिल्ह्याधिकारी यांच्याशी बोललो आहे. रुग्णालयाला अनेक सोयी सुविधा दिल्या आहेत. आणखी एक जागा पार्किंगसाठी दिली आहे. परंतु, डॉक्टर आणि कर्मचारी अशी मुघलशाही करत असतील तर आम्ही मान्य करणार नाही. शक्य असेल तर गुन्हे दाखल करू. असं आश्वासन देतो अस ही त्यांनी अधोरेखित केले आहे. मंत्री आशिष शेलार आणि काँग्रेस चे विजय वडट्टीवार यांच्या भेटीवर म्हणाले, महाराष्ट्राची संस्कृती आहे. विरोधी आणि सत्ताधारी एकत्र भेटत.

इतर राज्यासारख नाही. अनेकदा मला ही विजय वडट्टीवार भेटले आहेत. आशिष शेलार यांना कामानिमित्त भेटले असतील. पुढे ते म्हणाले, ते पक्षांतर्गत बोलले नाहीत. पक्ष सोडणार आहे, मला पक्षात यायचं आहे. अस बोलले नाहीत. त्यांनी काँग्रेस च काम करण्याची भूमिका घेतलेली आहे.पुढे ते म्हणाले, दीनानाथ मंगेशकर रुग्णालयावर कारवाई करण्यासाठी मर्यादा नाही. मंगेशकर परिवारावर थोडीच कारवाई आहे. चूक करणाऱ्यांवर कारवाई करत आहोत. ते कशाला आडवे येतील. असं त्यांनी स्पष्ट केलं आहे.

पुढे ते म्हणाले, मनसेच्या आंदोलनकर्त्यांनी शासकीय कर्मचाऱ्यांना मारहाण करू नये. चुकलं असेल तर त्यांना काढता येतं, कारवाई करता येते. त्यांनी हातात कायदा घेऊन नये. पुढे ते म्हणाले, संजय राऊत यांना मोदींच्या नावाचा, भाजपच्या नावाचा, देवेंद्र फडणवीस यांच्या नावाचा पंडू रोग झाला आहेया दुर्दैवी घटनेची गांभीर्याने दखल घेत उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी पुणे जिल्हाधिकाऱ्यांकडून याबाबतची संपूर्ण माहिती घेतली आहे. आरोग्य विभागाने तातडीने, पारदर्शक आणि निष्पक्षपणे चौकशी पूर्ण करण्याच्या सूचना दिल्या आहेत. रुग्णालय प्रशासनाने माध्यमांसमोर त्यांचे म्हणणे मांडले असले, तरी शासन या प्रकरणाचा सर्व संबंधित घटकांची सखोल चौकशी करून योग्य ती कारवाई करेल. या घटनेबाबत आंदोलन करणाऱ्या व्यक्ती, संस्था आणि संघटनांच्या भावना शासनाने समजून घेतल्या आहेत. चौकशीच्या निष्कर्षानुसार दोषी आढळणाऱ्यांवर कायद्यानुसार कठोर कारवाई केली जाईल.

### सखोल चौकशी करण्याचे आदेश

पुणे येथील दीनानाथ मंगेशकर रुग्णालयात तातडीने उपचार न मिळाल्याने तनिषा भिसे या भगिनीला आपला प्राण गमवावा लागला. ही घटना अत्यंत दुर्दैवी असून, शासनाने याची गंभीर दखल घेतली आहे. या प्रकरणाची सखोल चौकशी तज्ज्ञ डॉक्टरांच्या समितीद्वारे करण्याचे आदेश उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दिले आहेत.

# सुरक्षेसाठी बँक अधिकाऱ्यांचे मुख्यमंत्र्यांना साकडे

## मराठीच्या मुद्द्यावरून मनसेकडून मारहाण झाल्यानंतर संघटनेचे पत्र

। पुणे ।
महाईन्यूज । प्रतिनिधी।

**मराठी भाषेच्या मुद्द्यावरून महाराष्ट्र नवनिर्माण सेनेने (मनसे) बँक ऑफ महाराष्ट्राच्या (महाबँक) अधिकाऱ्यांना मारहाण केली होती. या प्रकरणी बँक ऑफ महाराष्ट्र ऑफिसर्स असोसिएशनने मुख्यमंत्र्यांना पत्र लिहिले आहे. बँक अधिकाऱ्यांना मारहाण करणाऱ्यांवर कठोर कारवाई करण्यासोबत सुरक्षेसाठी उपाययोजना करण्याची मागणी संघटनेने केली आहे.**



संघटनेचे अध्यक्ष राजीव ताम्हाणे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना याबाबत पत्र लिहिले आहे. त्यात म्हटले आहे की, मराठी भाषेची सक्ती मनसेकडून केली जात असून, सार्वजनिक बँकांतील अधिकारी याचा निषेध करीत आहेत. सार्वजनिक बँकांतील अधिकाऱ्यांच्या नियुक्त्या या देशभरात होतात. हे अधिकारी वेगवेगळ्या भाषिक पार्श्वभूमीचे असतात. त्यांच्या नियमितपणे देशभरात बदल्या होतात. त्यामुळे प्रत्येक बँक अधिकाऱ्याने तो नियुक्त असलेल्या ठिकाणची स्थानिक भाषा शिकण्याची अपेक्षा ठेवणे अव्यवहार्य आहे.

काही गटांकडून बँक अधिकाऱ्यांना भाषेच्या मुद्द्यावर धमकावण्याचे आणि मारहाण करण्याचे प्रकार सुरू आहेत. या हल्ल्यांचा आणि सरकारी मालमत्तेच्या नुकसानीचा आम्ही तीव्र निषेध करीत आहोत. यातून सर्वसामान्यांसाठी अत्यावश्यक असलेली बँकिंग सेवा विस्कळीत होत आहे. अशा प्रकारच्या गोष्टींना कोणत्याही स्थितीत खपवून घेतले जाऊ नये. अनेक सरकारी योजनांच्या अंमलबजावणीसाठी बँक अधिकारी परिश्रम घेतात. अनेक वेळा ते कामाच्या तासांव्यतिरिक्त जादा वेळ देऊन अथवा सुटीदिवशीही हे काम करतात. त्यामुळे त्यांना सुरक्षा देण्याची जबाबदारी सरकारची आहे, असेही संघटनेने पत्रात स्पष्ट केले आहे.बँक अधिकाऱ्यांना भाषेच्या मुद्द्यावर मारहाण करणे चुकीचे आहे. या प्रकरणी कठोर कारवाई न केल्यास आम्हाला संप करण्यासह कायदेशीर पावले उचलण्याशिवाय पर्याय राहणार नाही.

### हे अधिकारी वेगवेगळ्या भाषिक

संघटनेचे अध्यक्ष राजीव ताम्हाणे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना याबाबत पत्र लिहिले आहे. त्यात म्हटले आहे की, मराठी भाषेची सक्ती मनसेकडून केली जात असून, सार्वजनिक बँकांतील अधिकारी याचा निषेध करीत आहेत. सार्वजनिक बँकांतील अधिकाऱ्यांच्या नियुक्त्या या देशभरात होतात. हे अधिकारी वेगवेगळ्या भाषिक पार्श्वभूमीचे असतात. त्यांच्या नियमितपणे देशभरात बदल्या होतात.

## विकास आराखड्यातील 24 मीटर रस्ता होणार

# मोशीतील लक्ष्मी चौक ते स्वराज रेसिडेन्सी रस्त्याला ‘गती’!

### आमदार महेश लांडगे यांचा यशस्वी पाठपुरावा

। पिंपरी-चिंचवड । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**पिंपरी-चिंचवड महापालिका विकास आराखड्यातील प्रस्तावित रस्ते ताब्यात घेवून त्याचा विकास करण्यासाठी प्रशासनाने पुढाकार घेतला आहे. मोशी येथील लक्ष्मी चौक ते स्वराज रेसिडेन्सी रस्त्याच्या कामाला गती देण्यात आली आहे.**



भाजपा नेते तथा आमदार महेश लांडगे यांनी शुक्रवारी महापालिका प्रशासनाचे अधिकारी आणि सहकाऱ्यांसोबत मोशी येथे विविध विकासकामांची पाहणी केली. यावेळी सामाजिक कार्यकर्ते निखील बोऱ्हाडे, निलेश बोराटे आणि ग्रामस्थ व सोसायटीधारक उपस्थित होते.

मोशी येथे लक्ष्मी चौक ते स्वराज रेसिडेन्सी येथील गेल्या अनेक वर्षांपासून प्रलंबित रस्त्याचे काम अखेर मार्गी लागले. महानगरपालिका विकास आराखड्यातील या 24 मीटर रस्त्यावर अतिक्रमण होते. सदर अतिक्रमण आणि शिवरस्त्यावरील बेकादेशीर अतिक्रमणही हटवण्यात आले. त्यामुळे जागा ताब्यात घेऊन रस्त्याचे काम सुरू करण्यात येत आहे, तशा सूचना प्रशासनाला दिल्या आहेत. यामुळे या भागातील स्थानिक नागरिक, वाहनचालकांना दिलासा मिळणार आहे.

### ... असा आहे रस्त्याचा फायदा :

1. पुणे-नाशिक रोडची परिसराची अंतर्गत ’कनेक्टीव्हीटी’,
2. भारतमाता चौक ते चिखली गावठाण रस्त्याला पर्यायी रस्ता,
3. रिव्हर सोसायटी, ऐश्वर्यम हमारा, स्वराज, प्रिस्टीन ग्रीन, क्रिस्टल सिटी आदी 30 सोसाट्यांना रस्ता उपलब्ध,
4. सुमारे 10 हजार सदनिकाधारकांसाठी सुविधा,
5. लक्ष्मी चौकाला जोडणाऱ्या रस्त्यावर वाहतूक कोंडी कमी होणार आहे.

“ समाविष्ट गावांच्या विकासाच्या मुद्यावर गेल्या 10 वर्षांपासून मतदार संघात काम करीत आहे. महापालिका सत्ता काळात समाविष्ट गावांतील पायाभूत सोयी-सुविधा सक्षम करण्यात आल्या. त्यामुळे “चिखली-मोशी-चऱ्होली रेसिडेन्सिअल कॉरिडॉर” तयार झाला. आगामी काळात उपनगरे आणि शहर यांची ‘कनेक्टिव्हीटी’ वाढवण्यासाठी आम्ही प्रयत्न करणार आहोत.

**–महेश लांडगे,**
आमदार, भोसरी विधानसभा, भाजपा, पिंपरी-चिंचवड, पुणे.

---

## रूग्णालयातील दोषींवर कारवाई करा!

# विधानसभा उपाध्यक्ष अण्णा बनसोडेंचे धर्मादाय आयुक्तांना आदेश

। पिंपरी-चिंचवड । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**पुण्यातील नामांकित दीनानाथ मंगेशकर रुग्णालयात प्रशासनाच्या मुजोरपणामुळे एका गर्भवती महिलेचा मृत्यू झाला. या घटनेनंतर शहरासह राज्यात संतापाची लाट उसळली आहे. दरम्यान, रुग्णालयाच्या हलगर्जीपणाची चौकशी करावी आणि दोषींवर कठोर कारवाई करावी, असे आदेश विधानसभा उपाध्यक्ष अण्णा बनसोडे यांनी दिले आहेत.**




गरोदर महिलेला रक्तस्त्राव होत असल्याने उपचारासाठी दिनानाथ मंगेशकर रुग्णालयात नेण्यात आले. परंतु आधी २० लाख भरा तरच अँडमीट करू असे सांगितले. त्यानंतर रुग्णाच्या नातेवाईकांनी ९ ते दु.२ पर्यंत मदतीसाठी वाट बघून शेवटी वाट पाहून दिनानाथ हॉस्पीटल मधून तिला ससून येथे नेण्यात आले. तिथे भिषण परिस्थिती बघून शेवटी वाकड सुर्या हॉस्पीटल येथे प्रसुतीसाठी नेण्यात आले तिथं महिलेची प्रसुती झाली परंतु अतिरक्तस्राव झाल्यामुळे तिचा मृत्यु झाला. सुशांत भिसे यांच्याकडे २० लाख रू ची मागणी करुन १० लाख भरायला सांगितले. पुढच्या दोन तासात गावाकडची शेती विकून पैसे भरतो.. पण अँडमीट करून घ्या.. अशी विनंती सुशांत करत होता. पण रुग्णालय प्रशासनाने उपचारासाठी नकार दिला. यासर्वात गर्भवती महिलेने दोन गोंडस जुळ्या मुलांना जन्म दिला मात्र महिलेचा जीव गमावला.

दरम्यान या घटनेची दखल घेत विधानसभा उपाध्यक्ष अण्णा बनसोडे यांनी धर्मादाय आयुक्तांना आदेश कारवाई करण्याचे आदेश दिले आहेत.

### काय म्हणाले आहेत

दीनानाथ मंगेशकर रुग्णालयात काल घडलेली जी घटना आहे ती फार दुर्दैवी आहे. पैशांच्या अभावी रूग्णाची डॉक्टरांनी काळजी न घेतल्याने, त्यांच्या निष्काळजीपणामुळं त्या महिलेचा मृत्यू झाला असं तिच्या कुटूंबाचं म्हणण आहे. मी धर्मादाय आयुक्तांना या संपूर्ण प्रकरणाची सखोल चौकशी करून त्यामध्ये दोषी आढळतील त्यांच्यावर कठोर कारवाई करण्यात यावी. असा मी आदेश देणार आहे. काल घडलेली जी घटना आहे तशी घटना संपूर्ण महाराष्ट्रमध्ये घडू नये, आमदार गोरखे यांच्या स्वीय सहाय्यकाची ती पत्नी होती, त्यांच्या दुर्दैवी जाण्याने या गोष्टीवर प्रकाश पडला. यापूर्वी अशा घडना घडल्या असतील, मात्र, अशा घटना घडू नये यासाठी मुंबईत गेल्यावरती एक बैठक घेणार आहे,.

## श्रीब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराजांची प्रवचने



### संत कसे असतात ?

आपले शहाणपण बाजूला ठेवून जो संताला शरण जातो तोच खरा साधक. ज्याला सर्व सृष्टी रामरूप दिसते, आणि शिष्यालाही जो रामरूप पाहतो, तोच खरा गुरू. सद्‌गुरू कधीही मिंधेपणाने वागत नाही, आणि त्याला भीतीचा लवलेशही नसतो. आपला शिष्य कोणत्या आध्यात्मिक भूमिकेवर आहे हे संतांना कळते. देहबुद्धीचे लोक विषयाचे दास असतात, पण संत मात्र विषयावर मालकी गाजवतात. संतांजवळ जे समाधान असते ते आपल्याला लाभले, किंवा त्याची आवड उत्पन्न झाली म्हणजे संताची प्रचीती आली असे समजावे. औषध काय आहे हे न कळतासुद्धा रोग्याने ते श्रद्धेने घेतले तर त्याला गुण येतो, किंवा एखाद्याला स्वयंपाक करता आला नाही तरी त्याला अन्नाची चव समजते आणि तो पोटभर जेवू शकतो. त्याचप्रमाणे एखाद्याला ज्ञानाचा अनुभव येईल, पण शब्दाने त्याला तो सांगता येईलच असे नाही.

मीठ खारट आहे याचे जसे आपल्याला दु:ख होत नाही, त्याचप्रमाणे जगामधल्या लढाया, हाणामाऱ्या, सज्जनांचा छळ, संकटे, यांचे संतांना वाईट वाटत नाही. 'वाईट वाटत नाही' याचा अर्थ ते त्यांना आवडते असा मात्र मुळीच नव्हे. पण मीठ जसे खारटच असणार, तशा जगात या घडामोडी होणारच, जगाची रहाटीच अशी आहे, हे समजून तो दु:ख करणार नाही. किंबहुना, मीठ फार झाले तर खारटपणा जसा सहन होत नाही, तसे त्यालाही होईल. इतकेच नव्हे, तर त्याचा प्रयत्नही जगातले वाईट कमी करण्याकडेच असतो.
विहिरीतल्या बेडकांना जशी समुद्राची कल्पना येत नाही तशी आपल्याला संतांची कल्पना येत नाही. संत हे पहिल्याने आपल्यासारखेच होते, परंतु अनुसंधानाच्या मार्गाने ते वर गेले. आपल्याला संत 'शोधण्याची' मुळीच जरुरी नाही. आपली इच्छा बलवत्तर असेल तर संतच आपला शोध करीत आपल्याकडे चालत येतील. आपली भावना कशी आहे इकडे संतांचे लक्ष असते. संत हा गुप्तपोलिसासारखा आहे; तो आपल्यामध्ये आपल्यासारखा राहतो, पण आपल्याला ओळखता येत नाही. संताला स्वत:च्या शरीरात काय चालले आहे ते सर्व दिसते; म्हणून तो रोगाची काळजी करीत नाही. संताला कर्म मागेपुढे करता येते, पण ते टाळता येत नाही; ते कुणाला तरी भोगलेच पाहिजे. संत जे साधन सांगतात ते आपल्या शक्तिप्रमाणेच असते. संत जो बोध सांगतात, त्याचे आपण थोडेतरी पालन करू या.

**बोधवचन:- संत हा जसे बोलतो तसे वागतो. आपण बोलतो चांगले आणि वागतो मात्र त्याच्या उलट.**

# मोदीजींचा यशस्वी अजेंडा, 'वक्फ बिला'ला हिरवा झेंडा!



'स्टेट'मेंट
अधिकराव दिवे-पाटील
संस्थापक, संपादक





**नरेंद्र मोदी सरकारने सादर केलेल्या वक्फ बोर्ड सुधारणा विधेयकाला संसदेच्या दोन्ही सभागृहांनी मंजुरी दिली. आता राष्ट्रपतींच्या स्वाक्षरीनंतर याचे कायद्यात रूपांतर होणार आहे ! नरेंद्र मोदी यांनी ही खेळी आत्ताच का केली? हे अनेकांच्या लक्षात सुद्धा आलेले नाही. मोदींचा हा अजेंडा अतिशय यशस्वी ठरला असून त्याचे दूर कामे परिणाम होणार आहेत, हे सांगायची आवश्यकता नाही.**

### गेली अनेक वर्षे भिजत घोंगडे !

'वक्फ बोर्ड आणि त्याचा एकूणच कारभार, जागांबद्दलचा वाद याचे वर्षानुवर्षे भिजत घोंगडे होते. अर्थात् मुस्लिम समाजासाठी विशेष हक्काच्या असलेल्या या बोर्डाच्या कायद्यात काही सुधारणाही आवश्यक होत्या. हीच संधी नरेंद्र मोदी यांनी साधली आणि हे विधेयक मांडले गेले.

### तास न् तास चर्चा आणि मतदान..

या विधेयकावर दोन्ही सभागृहात तास न् तास चर्चा झाली. वादळी चर्चेनंतर वक्फ सुधारणा विधेयक दोन्ही सभागृहात मंजूर झाले. लोकसभेत २८८ खासदारांनी विधेयकाच्या बाजूने, तर २३२ खासदारांनी विरोधात मतदान केले, पंतप्रधान नरेंद्र मोदी यावेळी सभागृहात मतदानासाठी उपस्थित नव्हते, याची नोंद अनेकांनी घेतली. राज्यसभेतही विधेयकाच्या बाजूने मतदान झाले, आणि राष्ट्रपतींच्या सहीचा मार्ग मोकळा झाला.

### 'वक्फ' नेमके केव्हापासून ?

पूर्वीच्या ब्रिटिश काळापासूनच नव्हे, तर मुघलांची सत्ता येण्यापूर्वीचाही इतिहास असणारी 'वक्फ' ही एक इस्लाम समाजातील व्यवस्था आहे. ही मूळ संकल्पना इस्लामच्या स्थापनेपासूनच आहे. ती मुळात उदात्त आहे आणि सगळ्यांच धर्मामध्ये दानसंकल्पना असते. ब्रिटिशांचे राज्य असताना वक्फमध्ये दान दिलेल्या दोन गावांचा वाद थेट लंडनमध्ये प्रिव्ही कौन्सिलपर्यंत गेला होता. हा अनुभव जमेस धरून इंग्रजांनी भारतात या साऱ्या प्रक्रियेला कायद्याची चौकट देण्याचा प्रयत्न केला होता.

### वक्फ कायदा भारतात अस्तित्वात!

पहिला वक्फ कायदा भारतात अस्तित्वात आला. आता केंद्र सरकारने प्रस्तावित केलेल्या सुधारणा या पहिल्या नाहीत. आधीही अनेकदा झाल्या आहेत. मात्र, प्रस्तावित सुधारणा योग्य आहेत का, हाही प्रश्न आहे. यामुळेच, केंद्र सरकारने या विधेयकाचा मसुदा संयुक्त संसदीय समितीकडे पाठविण्याचा निर्णय घेतला आणि तो स्वागतार्ह ठरला.

### मनमोहनसिंग यांनीही समिती नेमली..

मुस्लिम समाजाच्या प्रश्नांचा अभ्यास करण्यासाठी डॉ. मनमोहन सिंग यांच्या सरकारने सन २००५ मध्ये न्या. राजिंदरसिंह सबर समिती नेमली होती. या समितीने महत्त्वाच्या शिफारसी केल्या, त्यातल्या काही वक्फ व्यवस्थापनाशीही संबंधित होत्या. या शिफारसींचा समावेश मोदी सरकारने नव्या विधेयकात कसा आणि किती केला आहे, हे तपासून पाहण्याची संधी संयुक्त संसदीय समितीला मिळेल. भारतात केंद्रीय वक्फ बोर्ड आहे. त्याचप्रमाणे, सध्या २८ राज्यांमध्ये वक्फ मंडळे आहेत. देशातल्या सगळ्या वक्फ मंडळांकडे मिळून आठ लाख ७० हजार छोट्या-मोठ्या मालमत्ता आहेत, असे काही अहवालात म्हटले आहे.

### नव्या व्यवस्थेची मागणी

गेल्या काही वर्षांमध्ये विविध उच्च न्यायालये तसेच सर्वोच्च न्यायालय यांच्यासमोर शंभराहून अधिक याचिका आल्या आहेत. या सर्व याचिका विविध वक्फ बोर्डाबद्दल तक्रारी करणाऱ्या आहेत, तशाच नव्या व्यवस्थेची मागणी करणाऱ्याही आहेत. मुख्य म्हणजे, यातील अनेक याचिका मुस्लिम समाजातील लोकहितवादी संस्था व संघटनांनी केल्या आहेत. या पार्श्वभूमीवर देशातील सर्व वक्फ मंडळांचा कारभार पारदर्शक होण्यासाठी, त्यांच्याकडील मालमत्तांचा समाजहितासाठी विनियोग होण्यासाठी नवा कायदा अत्यंत आवश्यक आहे. हे काम अनेक वर्षे रखडले. ते आता कायद्यातील सुधारणेने मार्गी लागेल.

### मालमत्तांवरून अनेक संघर्ष

धर्माशी निगडीत कोणतीही व्यवस्था, यंत्रणा किंवा परंपरा असली की तिला सरकारने किंवा राज्यव्यवस्थेने हात लावू नये, ही अपेक्षा अनेक शतके चालत आली आहे. यातूनच भारतात काही ठिकाणी 'फकीर समाज' आणि राजे, संस्थानिक असाही संघर्ष उभा राहिला होता. मात्र, भारताने जी आधुनिक राज्यव्यवस्था, न्यायप्रणाली आणि लोकशाही स्वीकारली आहे, त्यामध्ये सर्वत्र सार्वजनिक बाबींचा संबंध येतो, तेथे कोणत्याही धर्माच्या परंपरांना दुय्यम स्थान मिळायला हवे. देशातील वक्फ मालमत्तांमधून सध्याच्या बाजारभावानुसार संपत्तीची निर्मिती होते का, आणि ती अर्थव्यवस्थेच्या मुख्य प्रवाहात येते का, अशी एक पाहणी झाली होती. तिचे निष्कर्ष मात्र धक्कादायक होते, हे सर्वांनी लक्षात घ्यायला हवे.

### मालमत्तेचा समाजहितासाठी वापर हवा

देशातील इतकी प्रचंड जमीन व मालमत्ता जर समाजहितासाठी वापरली जात नसेल, तर सरकारने तेथे हस्तक्षेप करणे आवश्यकच आहे. त्याचा विचार करून मोदी सरकारने याबाबत विरोधकांशी चर्चा करून या प्रकरणात एकमत कसे होईल, यासाठी वेगाने पावले टाकली. काँग्रेससहित इतर विरोधी पक्षांनीही भाजप आणि एनडीएच्या हिंदुत्वाच्या वाटेने मुस्लिमांवर अन्यायाचा गळाही काढला, परंतु त्याचा उपयोग झालेला दिसत नाही. अर्थात्, भाजपची आतापर्यंतची वाटचाल पाहता शंका येणे चुकीचे नाही. पण,वक्फ बोर्डांचे व्यवस्थापन आणि सर्वसामान्य मुस्लिम समाजाचे कल्याण यांचा काही संबंध उरला आहे का, असा प्रश्न नव्या कायद्याच्या विरोधकांनी स्वत:लाच विचारायला हवा. तसेच, केंद्र सरकारनेही या विषयाचे रूपांतर आपले समर्थक विषारी व धार्मिक प्रचारात करणार नाहीत ना, याची काळजी घ्यावी.

### राष्ट्रीय प्रश्नांमध्ये जुनीच पोपटपंची!

भारतात सगळ्या राष्ट्रीय परिचर्चा जुन्याच पोपटपंचीत नेण्याची खोड सगळ्यांना लागली आहे. त्यामुळे या कायद्याच्या सुधारणेतून आणि त्याच्या पारदर्शी अंमलबजावणीतून वक्फ बोर्डांचे कामकाज सुधारेल आणि अन्यायी कारभारातून सुटका झाली, तरच हे समाज सुधारणेचे पाऊल पुढे पडेल, हे निश्चित !

### मोदींचा अजेंडा मुस्लिमांच्या बाजूने..

देशाचे हित आणि विकास साधायचा असेल तर मुस्लिम समाजाला बरोबर घेऊन आणि त्यांच्याकडील मालमत्तेचा योग्य वापर करून वाटचाल करण्याशिवाय पर्याय नाही, हे नरेंद्र मोदी यांनी जाणले असून त्याचाच एक भाग म्हणून हे वक्फ बोर्ड विधेयक संमत झाले आहे. राष्ट्रपतींच्या सहीसाठी ते पाठवले गेले आहे आणि सही होताच मुस्लिमांना आवडेल असा कायदा भारतात अस्तित्वात येईल, याची सर्वांनाच खात्री आहे !

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे- पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे- 411018 येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव । मुख्य कार्यकारी संपादक : सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) विशेष सूचना: हा अंक कोणत्याची प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

# लवकरच बीकेसीत पर्यावरण भवन!

## एमएमआरडीएकडून प्रदूषण नियंत्रण मंडळाला बीकेसीतील जागा

। मुंबई ।
प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**वांद्रे – कुर्ला संकुलातील ३४०० चौरस मीटर जागेवर लवकरच महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाची प्रशासकीय इमारत अर्थात पर्यावरण भवन उभे राहणार आहे. या इमारतीच्या उभारणीसाठी मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने (एमएमआरडीए) बीकेसीतील ३४००.५९ चौटर मीटर जागा ८० वर्षांच्या भाडेकरारावर देण्याचा निर्णय घेतला आहे.**



यासंबंधीच्या प्रस्तावाला गेल्या आठवड्यात झालेल्या एमएमआरडीए प्राधिकरणाच्या १५९ व्या बैठकीत मान्यता देण्यात आली. म्हणून नवीन प्रशासकीय इमारतीची गरज जल, वायू आणि इतर प्रकारचे प्रदूषण रोखण्यासाठी विविध प्रकारचे कार्यक्रम आखून त्याची अंमलबजावणी करण्याची जबाबदारी प्रदषण नियंत्रण मंडळावर आहे. प्रदूषण नियंत्रण मंडळाचे मुख्यालय शीव येथील कल्पतरू पॉईंट या इमारतीत आहे. मागील काही वर्षांपासून प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या कामाची व्याप्ती वाढत आहे. जल, वायू प्रदूषण नियंत्रणासाठी काम करणाऱ्या या मंडळावर आता बांधकाम, जैव-वैद्यकीय टाकाऊ पदार्थ व्यवस्थापन आणि हाताळणी, प्लास्टिक प्रदूषण, कचरा प्रदूषण, माती प्रदूषण अशा अनेक प्रकारच्या प्रदूषण नियंत्रणाची जबाबदारी आहे.परिणामी, मंडळाला आता मनुष्यबळ आणि पायाभूत सुविधांच्या विकासाची गरज निर्माण झाली र्प्रदूषण नियंत्रण मंडळात सध्या ७०० ते ८०० मनुष्यबळ असून त्यात लवकरच १००० ने वाढ होणार आहे.

मंडळातील १००० पदे भरण्यात येणार आहेत. याअनुषंगाने सध्याचे कार्यालय अपुरे पडण्याची शक्यता असून भव्य प्रशासकीय इमारतीची गरज लक्षात घेऊन काही महिन्यांपूर्वी मंडळाने एमएमआरडीएकडे जागेची मागणी करण्यात आल्याची माहिती वरिष्ठ अधिकाऱ्यांनी दिली. ही मागणी मान्य करून एमएमआरडीएने अखेर प्रदूषण नियंत्रण मंडळाला जागा देण्याचा निर्णय घेतल्याची माहिती एमएमआरडीएकडून देण्यात आली. बीकेसीतील जी ब्लॉकमधील सी ७९ या भूखंडावर पर्यावरण भवन उभे राहणार असून हा भूखंड एकूण ३४००.५९ चौस मीटर क्षेत्रफळाचा आहे. यावर मंडळाला चार चटईक्षेत्र निर्देशांकाप्रमाणे १३,६०२.३६ चौरस मीटर इतके बांधकाम क्षेत्रफळ उपलब्ध होणार आहे. या जागेसाठी प्रदूषण नियंत्रण मंडळाला ४६८.६० कोटी रुपये मोजावे लागणार आहेत. दोन महिन्यांत यापैकी २५ टक्के रक्कम मंडळाला अदा करावी लागणार आहे. त्यानंतर पुढील दहा महिन्यांच्या आत उर्वरित ७५ टक्के रक्कम भरणे गरजेचे आहे. लवकरच २५ टक्के रक्कम एमएमआरडीएला अदा केली जाणार असल्याचेही प्रदूषण नियंत्रण मंडळातील वरिष्ठ अधिकाऱ्यांनी सांगितले. येत्या काही वर्षांतच बीकेसीत प्रदूषण नियंत्रण मंडळाचे भव्य पर्यावरण भवन उभे राहणार असून येथूनच मंडळाचा कारभार चालणार आहे. यासंबंधीच्या प्रस्तावाला गेल्या आठवड्यात झालेल्या एमएमआरडीए प्राधिकरणाच्या १५९ व्या बैठकीत मान्यता देण्यात आली. म्हणून नवीन प्रशासकीय इमारतीची गरज जल, वायू आणि इतर प्रकारचे प्रदूषण रोखण्यासाठी विविध प्रकारचे कार्यक्रम आखून त्याची अंमलबजावणी करण्याची जबाबदारी प्रदषण नियंत्रण मंडळावर आहे. प्रदूषण नियंत्रण मंडळाचे मुख्यालय शीव येथील कल्पतरू पॉईंट या इमारतीत आहे. मागील काही वर्षांपासून प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या कामाची व्याप्ती वाढत आहे.

### 1000 पदे भरण्यात येणार

जैव-वैद्यकीय टाकाऊ पदार्थ व्यवस्थापन आणि हाताळणी, प्लास्टिक प्रदूषण, कचरा प्रदूषण, माती प्रदूषण अशा अनेक प्रकारच्या प्रदूषण नियंत्रणाची जबाबदारी आहे.परिणामी, मंडळाला आता मनुष्यबळ आणि पायाभूत सुविधांच्या विकासाची गरज निर्माण झाली र्प्रदूषण नियंत्रण मंडळात सध्या ७०० ते ८०० मनुष्यबळ असून त्यात लवकरच १००० ने वाढ होणार आहे. मंडळातील १००० पदे भरण्यात येणार आहेत. याअनुषंगाने सध्याचे कार्यालय अपुरे पडण्याची शक्यता असून भव्य प्रशासकीय इमारतीची गरज लक्षात घेऊन काही महिन्यांपूर्वी मंडळाने एमएमआरडीएकडे जागेची मागणी करण्यात आल्याची माहिती वरिष्ठ अधिकाऱ्यांनी दिली.

# नांदेड ट्रॅक्टर अपघाताप्रकरणी मोदींकडून शोक

## पीडितांसाठी जाहीर केली दोन लाखांची मदत देण्याची घोषणा

। मुंबई ।
प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**नांदेड जल्ह्यातील आसेगावमध्ये शुक्रवारी सकाळी भीषण अपघात घडला आहे. यामध्ये हळद काढणी करणाऱ्या १० महिला मजुरांना घेऊन जाणारा ट्रॅक्टर विहिरीत पडला. यामध्ये ७ महिला मजुरांचा मृत्यू झाला आहे. या अपघातातील सर्व महिला मजूर या हिंगोलीतील गुंज तालुक्यातील रहिवासी असल्याची प्राथमिक माहिती समोर आली आहे. अपघातग्रस्त मजूरांना वाचवण्यासाठी गावकऱ्यांच्या मदतीने प्रशासनाकडून प्रयत्न केले यामध्ये तीन महिलांना वाचवण्यात यश आले.**



दरम्यान या अपघाताची माहिती समोर आल्यानंतर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी याबाबत दु:ख व्यक्त केले आहे. याचबरोबर मृतांच्या कुटुंबीयांना आणि जखमींना आर्थिक मदत देण्याची घोषणा केली आहे.एक्सवर केलेल्या एका पोस्टमध्ये पंतप्रधान नरेंद्र मोदी म्हणाले, “महाराष्ट्रातील नांदेड इथल्या अपघातात झालेल्या जीवितहानीबद्दल कळाल्यानंतर दु:ख झाले. या अपघातात ज्यांनी आपले प्रियजन गमावले आहेत त्यांच्याप्रती शोकसंवेदना. जखमी लवकर बरे होवोत अशी प्रार्थना करतो. या दुर्घटनेतील पिडीतांना स्थानिक प्रशासन मदत करत आहे. प्रधानमंत्री राष्ट्रीय मदत निधीतून मृतांच्या कुटुंबियांना प्रत्येकी दोन लाख रुपयांची मदत दिली जाईल. तर, जखमींना ५० हजार रुपयांची मदत दिली जाईल.”तत्पूर्वी, महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी नांदेड अपघातावर दुःख व्यक्त केले आणि मुख्यमंत्री मदत निधीतून मृतांच्या कुटुंबियांना ५ लाख रुपयांची आर्थिक मदत जाहीर केली.मुख्यमंत्री फडणवीस यांनी याबाबत त्यांच्या एक्स अकाउंटवर पोस्ट केली आहे. या पोस्टमध्ये म्हटले आहे की, “नांदेड जिल्ह्यातील आसेगाव येथे आज सकाळी ११ महिला मजुरांना घेऊन जाणारी ट्रॅक्टर ट्रॉली विहिरीत पडून झालेल्या अपघातात काही महिलांचा मृत्यू झाल्याची घटना दुर्दैवी आहे. मी त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करतो. हिंगोली जिल्ह्यातील गुंजगाव येथील या महिला होत्या आणि शेतिकामासाठी त्या जात होत्या.”ते पुढे म्हणाले की, “या महिलांना विहिरीतून बाहेर काढण्याचे काम युद्धपातळीवर हाती घेण्यात आले असून निवासी उपजिल्हाधिकारी, अतिरिक्त पोलीस अधीक्षक यासह संपूर्ण यंत्रणा घटनास्थळी आहे. ३ महिलांना सुखरूप बाहेर काढण्यात आले आहे. हिंगोली आणि नांदेड दोन्ही प्रशासनाच्या आम्ही संपर्कात आहोत. मृतांच्या कुटुंबीयांना मुख्यमंत्री सहायता निधीतून ५ लाख रुपये अर्थसहाय्य देण्यात येईल.”

### मुख्यमंत्र्यांनीही जाहीर केली मदत

“महाराष्ट्रातील नांदेड इथल्या अपघातात झालेल्या जीवितहानीबद्दल कळाल्यानंतर दु:ख झाले. या अपघातात ज्यांनी आपले प्रियजन गमावले आहेत त्यांच्याप्रती शोकसंवेदना. जखमी लवकर बरे होवोत अशी प्रार्थना करतो. या दुर्घटनेतील पिडीतांना स्थानिक प्रशासन मदत करत आहे.

# अमेरिकेकडून व्यापार नियमांचे उल्लंघन!

## चीनचे ट्रम्प यांना प्रत्युत्तर, अमेरिकेवर लादला 34 टक्के व्यापार कर

।ओडिशा।
प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी चीनवर लादलेल्या अतिरिक्त व्यापार करामुळे दोन्ही देशांमध्ये तणावाचे वातावरण आहे. अशात आता आज चीननेही अमेरिकेतून चीनमध्ये आयात होणाऱ्या सर्व वस्तूंवर ३४% अतिरिक्त व्यापार कर लावण्याची घोषणा केली आहे. दरम्यान अमेरिकन आयातीवर हा व्यापार कर १० एप्रिलपासून लागू करण्यात येणार आहे.**




चीनच्या वाणिज्य मंत्रालयाने सांगितले की, त्यांनी सात दुर्मिळ पृथ्वी घटकांवर निर्यात नियंत्रणे लादली आहेत, ज्यात गॅडोलिनियम जे सामान्यतः एमआरआयमध्ये आणि यट्रियम, जे ग्राहकोपयोगी इलेक्ट्रॉनिक्समध्ये वापरला जाते, यांचा समावेश आहे. पुढे, मंत्रालयाने आपल्या निवेदनात म्हटले आहे की, "चीनने जागतिक आरोग संघटनेच्या विवाद निवारण यंत्रणेअंतर्गत दावा दाखल केला आहे."याशिवाय, चीनने ११ अमेरिकन संरक्षण कंपन्यांचा अविश्वसनीय युनिट यादीत समावेश केला असून, १६ अमेरिकन कंपन्यांवर निर्यात नियंत्रणे लादण्याच्या तयारीत आहे. जानेवारीमध्ये ट्रम्प यांची पुन्हा अमेरिकेच्या राष्ट्राध्यक्षपदी निवड झाल्यानंतर अमेरिका आणि चीनमधील तणाव वाढला आहे. अमेरिका आणि जगभरातील अनेक देशांचे व्यापार करावरून वाद सुरू आहेत. २ एप्रिल रोजी डोनाल्ड ट्रम्प यांनी चीन आणि भारतासह अनेक देशांविरुद्ध वाढीव व्यापार कर आकारण्याचा निर्णय जाहीर केला होता. याशिवाय, फेंटानिल औषधांबाबतही ट्रम्प चीनवर खूप नाराज आहेत.गेल्या वर्षी, चीनने अमेरिकेतून सुमारे १६४ अब्ज डॉलर्स किमतीच्या वस्तू आयात केल्या आहेत. ज्या चार वर्षातील सर्वात कमी आहेत. "अमेरिकेचा अतिरिक्त व्यापार कर आकारण्याचा निर्णय आंतरराष्ट्रीय व्यापार नियमांचे उल्लंघन आहे. अमेरिकेचा हा निर्णय एकतर्फी असून चीनच्या कायदेशीर हक्कांना आणि हितसंबंधांना कमजोर करत आहे", असे चीनच्या अर्थ मंत्रालयाने अमेरिकेवर ३४% व्यापार कर जाहीर करताना एका निवेदनात म्हटले आहे. डोनाल्ड ट्रम्प यांनी नुकतेच अनेक देशांवर अतिरिक्त व्यापार कर लादला आहे. यामध्ये भारत, चीनसह अनेक देशांचा समावेश आहे. यातील कॅनडा आणि चीनने अमेरिकेवरही व्यापार कर लादत जशास तसे उत्तर दिले आहे. पण, यामधील अनेक देशांनी यावर अद्याप उघडपणे प्रतिक्रिया दिलेली नाही. भारतानेही याबाबत

### चीनकडून जशास तसे उत्तर

दरम्यान बुधवारी अमेरिकेने चीनवर अतिरिक्त व्यापार कर लागू केल्यानंतर, आज चीननेही अमेरिकेतून आयात होणाऱ्या सर्व वस्तूंवर ३४% अतिरिक्त व्यापार कर लावण्याची घोषणा केली आहे. दरम्यान अमेरिकन आयातीवर हा व्यापार कर १० एप्रिलपासून लागू करण्यात येणार आहे.चीनच्या वाणिज्य मंत्रालयाने सांगितले की, त्यांनी सात दुर्मिळ पृथ्वी घटकांवर निर्यात नियंत्रणे लादली आहेत, ज्यात गॅडोलिनियम जे सामान्यतः एमआरआयमध्ये आणि यट्रियम, जे ग्राहकोपयोगी इलेक्ट्रॉनिक्समध्ये वापरले जाते, यांचा समावेश आहे. आपल्या निवेदनात म्हटले आहे की, "त्यांनी जागतिक आरोग संघटनेच्या विवाद निवारण यंत्रणेअंतर्गत दावा दाखल केला आहे.


सावध भूमिका घेत याचा अभ्यास करणार असल्याचे म्हटले. अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी २ एप्रिल हा दिवस अमेरिकेचा 'मुक्ति दिन' म्हणून घोषित केला होता. यासोबतच त्यांनी जागतिक अर्थव्यवस्थेत मोठी उलथापालथ घडवून आणली. बुधवारी ट्रम्प यांनी भारतासह अनेक देशांवर अतिरिक्त व्यापार कर लादण्याची घोषणा केली होती.यावेळी चीनबाबत कडक भूमिका घेत ट्रम्प यांनी चिनी उत्पादनांवर अतिरिक्त ३४% कर लादण्याची घोषणा केली होती. याला प्रत्युत्तर म्हणून शुक्रवारी चीननेही अमेरिकन उत्पादनांवर ३४% कर लादण्याची घोषणा केली. यावर आता अमेरिकन राष्ट्राध्यक्षांची प्रतिक्रिया समोर आली आहे. ट्रम्प म्हणाले आहेत की, चीन घाबरला असून, भीतीने ते खूप चुकीची पावले उचलत आहेत.चीनने शुक्रवारी अमेरिकेतून आयात होणाऱ्या उत्पादनांवर ३४ टक्के कर लावण्याची घोषणा केली. त्यानंतर डोनाल्ड ट्रम्प यांनी चीनवर संताप व्यक्त केला आहे. ट्रूथ सोशल सोशल मीडिया प्लटफॉर्म पोस्ट करत डोनाल्ड ट्रम्प यांनी लिहिले की, "त्यांनी चूक केली आहे. ते आता घाबरले आहे. ते असे करू शकत नाहीत.


# पियुष गोयल यांनी स्टार्टअप्सना फटकारले


## आपल्याला फक्त दुकानदारी करायची आहे का : पियुष गोयल

।मुंबई।
प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**"आईस्क्रीम आणि चिप्स बनवून आपल्याला फक्त दुकानदारी करायची आहे का?" असं म्हणत केंद्रीय मंत्री पियुष गोयल यांनी भारतीय स्टार्टअप्सवर टीका केली आहे. या टीकेनंतर अनेक स्टार्टअप्स उद्योजकांनी पियुष गोयल यांचा समाचार घेतला. अमेरिका आणि चीननंतर भारताची स्टार्टअप इकोसिस्टम जगातील तिसऱ्या क्रमांकाची असली तरीही पियुष गोयल यांनी टीका केल्यानं अनेक उद्योजकांनी संताप व्यक्त केला आहे.**



"अनेक भारतीय स्टार्टअप्स अन्न वितरण, सट्टेबाजी आणि काल्पनिक खेळांवर लक्ष केंद्रित करत आहेत, तर चिनी स्टार्टअप्स इलेक्ट्रिक वाहने, बॅटरी तंत्रज्ञान, सेमीकंडक्टर आणि कृत्रिम बुद्धिमत्तेवर काम करत आहेत. आपल्याला फक्त आईस्क्रीम आणि चिप्सच बनवायचे आहे का? आफल्याला दुकानदारीच करायची आहे का?" असे गोयल यांनी आपल्या भाषणात विचारले. देश महत्त्वाच्या तंत्रज्ञानात सखोल नवोपक्रम आणि दीर्घकालीन प्रगती करण्याऐवजी मोठ्या नोकऱ्या निर्माण करण्यावर समाधानी आहे का? असा प्रश्न त्यांनी उपस्थित केला. या टीकेमुळे स्टार्टअप आणि टेक जगतातील सुप्रसिद्ध व्यक्तींकडून तीव्र प्रतिक्रिया आल्या आहेत. इन्फोसिसचे माजी सीएफओ आणि एक प्रमुख गुंतवणूकदार मोहनदास पै म्हणाले की, "ही वाईट तुलना आहे. भारतातही प्रत्येक क्षेत्रात स्टार्टअप्स आहेत. परंतु ते लहान स्वरुपात आहेत. मंत्री पियुष गोयल यांनी आपल्या स्टार्टअप्सना कमी लेखू नये, तर स्वतःला विचारावे की त्यांनी आपले मंत्री म्हणून भारतात डीप

### स्टार्टअप्स वाढवण्यास काय मदत केली?

"भारतातील राजकारण्यांनाच 'वास्तविकता तपासणी'ची आवश्यकता आहे. बाकी सर्वजण भारताच्या परिपूर्ण वास्तवात जगत आहेत", असे ग्रोव्हर म्हणाले. "चीनमध्येही सुरुवातीला अन्न वितरणाला सुरुवात झाली होती आणि नंतर ते सखोल तंत्रज्ञानाकडे वळले. त्यांनी जे केले आहे त्यासाठी आकांक्षा बाळगणे खूप चांगले आहे.

टेक स्टार्टअप्स वाढण्यास मदत करण्यासाठी काय केले आहे?" पै यांनी X वर लिहिले."आमच्याकडे एक अर्थमंत्री निर्मला सीतारमण आहेत. जे अनेक वर्षांपासून एंजेल टॅक्सवर स्टार्ट अप्सना त्रास देत आहे, एंडोमेंट्सना गुंतवणूक करू देत नाही, विमा कंपन्या अजूनही जागतिक स्तरावर गुंतवणूक करत नाहीत. भारतीय रिझर्व्ह बँक नियमितपणे रेमिटन्स आणि AIF वर परदेशी गुंतवणूकदारांना त्रास देते, वाईट वागणूक देते. चीनने २०१४ ते २०२४ पर्यंत ८४५ अब्ज डॉलर्सची गुंतवणूक केली. भारतात फक्त १६० अब्ज डॉलर्सची गुंतवणूक! मंत्री पियुष गोयल आणि आश्विनी वैष्णव या समस्या सोडवण्यास मदत का करत नाहीत?" असाही प्रश्न पै यांनी उपस्थित केला. भारत पेचे माजी सह-संस्थापक अश्नीर ग्रोव्हर यांनीही गोयल यांच्यावर भारताच्या स्टार्टअप इकोसिस्टमवर टीका केल्याबद्दल टीका केली .

# कायदे कडक असून चालत नाही!



कोलकाता येथील महिला डॉक्टरवर बलात्कार होऊन तिची हत्या करण्यात आली. या प्रकरणाच्या काही दिवसानंतरच बदलापुर येथील दोन चिमुरडींवर लैंगिक अत्याचार झाल्याची घटना घडलीय. या सगळ्यात सोशल मिडीयावर महिलांच्या सुरक्षेविषयी आणि या प्रकरणावर अनेक जण व्यक्त होताना दिसत आहेत. मनोरंजन विश्वातील कलाकार मंडळी मोठ्या संख्येने या दोन्ही प्रकरणावर व्यक्त होताना दिसत आहेत. सोशल मिडीयावर अनेक कलाकार न्यायासाठी आणि आरोपींना शिक्षा मिळाव्या याबाबत पोस्ट करत आहेत. हिंदीसह मराठी कलाकारही मोठ्या संख्येने सोशल मिडीयाच्या माध्यमातून मतं मांडताना दिसत आहेत.अभिनेत्री तेजस्विनी पंडितही कायम महत्त्वाच्या घडामोडींवर तिचं परखड मत मांडण्यासाठी ओळखली जाते. सध्याच्या बलात्कार प्रकरणावर होणारं राजकारण आणि कायदा यावर तेजस्विनीने मत मांडलय.तेजस्विनीने तिच्या सोशल मिडिया इन्स्टाग्राम अकाउंटवर पोस्ट शेयर केलीय. या स्टोरी पोस्टमध्ये तेजस्विनी लिहीते की, “बलात्कार किंवा लैंगिक अत्याचार करणाऱ्याला जातपात, धर्म नसतो... फक्त वृत्ती असते आणि तीच ठेचली पाहिजे. ज्यासाठी जाच बसणं गरजेचं आहे. नुसते कायदे कडक असून चालत नाही, ते आपल्याकडे आहेतच... अंमलात कधी आणायचे?”

असं म्हणत तेजस्विनीने व्यवस्थेला जाब विचारलाय. शिवाय बलात्कारासारख्या प्रकरणावरुन राजकारण करणाऱ्यांना

## मनोज कुमार यांना अनेक पुरस्कारांनी आलं गौरविण्यात



बॉलीवूडचे दिग्गज अभिनेते व दिग्दर्शक मनोज कुमार यांचं वयाच्या ८७व्या वर्षी निधन झालं आहे. मुंबईतील कोकिलाबेन धीरूबाई अंबानी रुग्णालयात त्यांनी अखेरचा श्वास घेतला. गेल्या बऱ्याच दिवसांपासून मनोज कुमार आजारी होते. त्यामुळे त्यांना रुग्णालयात दाखल करण्यात आलं होतं. पण, आज मनोज कुमार यांची प्राणज्योत मालवली. त्यामुळे बॉलीवूडमध्ये शोककला पसरली आहे. मनोज कुमार यांना आजवरच्या कारकिर्दीमध्ये अनेक पुरस्कारांनी गौरविण्यात आलं. याबद्दल जाणून घेऊयात... ९ ऑक्टोबर १९५६ साली हिरो बणण्याचं स्वप्न उराशी घेऊन वयाच्या १९व्या वर्षी मनोज कुमार यांनी दिल्लीहून मुंबई गाठली. १९५७ मध्ये पहिल्या चित्रपटात १९ वर्षांच्या मनोज कुमार यांनी एका ८०-९० वर्षांच्या भिकारीची छोटीशी भूमिका केली. सुरुवातीला हरिकिशन गोस्वामी असं मनोज यांचं नाव होतं, जे नंतर बदललं गेलं. बॉलीवूडमधील मोलाच्या योगदानासाठी मनोज कुमार यांना पद्मश्रीपासून ते दादासाहेब फाळकेपर्यंत पुरस्कारापर्यंत गौरविण्यात आलं.मनोज कुमार यांच्या ‘उपकार’ चित्रपटाला राष्ट्रीय सर्वोत्कृष्ट चित्रपटाचा पुरस्कार मिळाला होता. १९६७ मध्ये हा चित्रपट प्रदर्शित झाला होता.

## अभिनयाची आवड, तयारी अन् परफेक्शन

बॉलीवूड अभिनेता जिम सरभने पद्मावत, नीरजा, मिसेस चॅटर्जी व्हर्सेज नॉर्वे यासर अनेक चित्रपट आणि मेड इन हेवन या वेब सीरिजमध्ये दमदार अभिनयाने प्रेक्षकांची मनं जिंकली. जिम इंडियन एक्स्प्रेसच्या द सुविर सरन शोमध्ये त्याची अभिनयाची आवड, तयारी आणि परफेक्शन यासह वैयक्तिक व व्यावसायिक आयुष्याबद्दल गप्पा मारणार आहे. त्याची लाइव्ह मुलाखत पाहण्यासाठी खाली दिलेल्या लिंकवर क्लिक करा. बॉलीवूड अभिनेता जिम सरभने पद्मावत, नीरजा, मिसेस चॅटर्जी व्हर्सेज नॉर्वे यासर अनेक चित्रपट आणि मेड इन हेवन या वेब सीरिजमध्ये दमदार अभिनयाने प्रेक्षकांची मनं जिंकली. जिम इंडियन एक्स्प्रेसच्या द सुविर सरन शोमध्ये त्याची अभिनयाची आवड, तयारी आणि परफेक्शन यासह वैयक्तिक व व्यावसायिक आयुष्याबद्दल गप्पा मारणार आहे.

## माधुरी दीक्षितला जीवे मारण्याचा कट



माधुरी दीक्षितला ९० च्या दशकातील ‘लेडी सुपरस्टार’ म्हणून ओळखलं जातं. त्या काळात अनेक अभिनेत्रींना अंडरवर्ल्डकडून लक्ष्य केलं जायचं, अशाच एका डॉनला माधुरी दुबईत यावी असं वाटत होतं. मात्र, अभिनेत्री या गोष्टीला कधीच तयार झाली नाही. यानंतर तिला जीवे मारण्याचा कट रचण्यात आला होता, असा दावा लेखक आणि ज्येष्ठ पत्रकार जितेंद्र दीक्षित यांनी एका पॉडकास्टमध्ये केला आहे. तसेच सेवानिवृत्त एसीपी अविनाश धर्माधिकारी यांनी काही दिवसांपूर्वीच एनडीटीव्हीला दिलेल्या मुलाखतीत या गोष्टीचा खुलासा केला होता. माधुरी दीक्षित त्याकाळी बॉलीवूडमध्ये आघाडीची अभिनेत्री होती. तिचे असंख्य चाहते होते. ‘धकधक गर्ल’ एकामागून एक हिट चित्रपट देत होती. याचदरम्यान अंडरवर्ल्ड डॉन अनीस इब्राहिमची नजर माधुरी दीक्षितवर पडली.अनीस इब्राहिम बॉलीवूड अभिनेत्रींना बेकायदेशीर कृत्यांमध्ये अडकवत होता, असं म्हटलं जायचं. त्याने माधुरी दीक्षितलाही अडकवण्याचा प्रयत्न केला. अनीस इब्राहिम मोठ्या पार्ट्या आयोजित करायचा; ज्यामध्ये काही नायिकाही सहभागी व्हायच्या आणि तो त्यांना महागड्या भेटवस्तू देखील द्यायचा. अनीसने माधुरीबरोबरही असंच केलं.

## ९ वर्षांच्या मेहनतीनंतर प्रसिद्ध बॉलीवूड अभिनेत्याच्या मुलाला मिळालं काम



फिल्म इंडस्ट्रीमध्ये काम करायचे असेल किंवा फिल्म इंडस्ट्रीमध्ये यशस्वी व्हायचे असेल तर आपल्या डोक्यावर एखाद्या गॉडफादरचा हात असणं महत्त्वाचं आहे अशी काहींची समज असते. तसंच स्टारकिड असल्याचा या इंडस्ट्रीत फायदा होतो अशीही काही उदाहरणं आहेत. मात्र काहीजण या उदाहरणांना अपवाद असतात. स्टारकिड असूनही अनेकांना या इंडस्ट्रीत येण्यासाठी संघर्ष हा करावा लागतो आणि स्वत:च्या मेहनतीवर इथे आपलं स्थान निर्माण करावं लागतं. अशीच मेहनत करत बॉलीवूडमध्ये आपलं स्थान निर्माण करण्यासाठी एक स्टारकिड आता सज्ज झाला आहे आणि हा स्टारकिड म्हणजे बॉलीवूड अभिनेता गोविंदाचा (GOVINDA) मुलगा यशवर्धन आहुजा (YASHVARDHAN AHUJA).

अनेकजण स्टार किड्सना सगळं आयतं मिळतं म्हणत ट्रोल करत असतात. पण गोविंदाचा मुलगा मात्र त्याला अपवाद ठरला आहे. तब्बल नऊ वर्षांच्या कठोर परिश्रमानंतर गोविंदाच्या मुलाला बॉलीवूडमध्ये पदार्पणाची संधी मिळाली आहे.नऊ वर्षात गोविंदाच्या मुलानं तब्बल ७९ ऑडिशन्स दिल्या आहेत. पण त्याला सगळीकडून नकार मिळाला.

अखेर त्याचं नशीब चमकलं असून लवकरच तो बॉलिवूडमध्ये पदार्पण करणार आहे. नऊ वर्षांच्या मेहनतीनंतर यशवर्धनला त्याचा पहिला चित्रपट मिळाला आहे. त्यामुळे गोविंदाचा मुलगा यशवर्धन अहुजाच्या पदार्पणाच्या चित्रपटाची चाहते मंडळी आतुरतेनं वाट पाहत होते.यशवर्धनने एका मुलाखतीत बोलताना त्याच्या बॉलिवूड पदार्पणाबाबत खुलासा केला आहे. याबद्दल त्याने म्हटलं की, “मी गेल्या नऊ वर्षांपासून ऑडिशन देत आहे. पण प्रत्येक वेळी माझ्या पदरी नकारच मिळाला. अनेकदा ऑडिशन दिलं आणि त्यानंतरच मला हे संधी मिळाली आहे. मी नऊ वर्षांपासून तयारी करत होतो आणि अनेकदा नाकारण्यात आल्यानंतर आता मी बॉलीवूडमध्ये येण्यास सज्ज झालो आहे.

# लखनौने मुंबईला दिला पराभवाचा दणका!

## नाट्यमय सामन्यात मुंबई इंडियन्सवर मिळवला दणदणीत विजय



। नवी दिल्ली ।
प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**लखनौ सुपर जायंट्स संघाने मुंबई इंडियन्स विरूद्ध नाट्यमय सामन्यात अखेरच्या षटकात शानदार विजय मिळवला. लखनौने मुंबई इंडियन्सवर १२ धावांनी विजय मिळवत मोसमातील दुसरा विजय नोंदवला. लखनौसमोर मुंबई इंडियन्सचा रेकॉर्ड कायमचं खराब राहिला आहे आणि पुन्हा एकदा लखनौने मुंबईला पराभूत करत हा रेकॉर्ड कायम ठेवला आहे. आवेश खानने अखेरच्या षटकात कमालीची गोलंदाजी करत मुंबईला पराभवाचा दणका दिला.**

मुंबई इंडियन्सला अखेरच्या षटकात २२ धावांची गरज होती. आवेश खानकडे गोलंदाजी करण्याची जबाबदारी आली. आवेशच्या पहिल्याच चेंडूवर हार्दिकने षटकार लगावला. यानंतर हार्दिकने २ धावा घेतल्या. तिसऱ्या चेंडूवर हार्दिकने धाव घेण्यास नकार दिला. चौथ्या चेंडूवर मोठा फटका मारायला हार्दिक चुकला. पाचव्या चेंडूवर हार्दिकने एक धाव घेतली आणि सहाव्या चेंडूवर धाव मिळाली नाही. पहिल्या चेंडूवर षटकार बसलेला असतानाही आवेश खानने यॉर्कर टाकत उत्कृष्ट गोलंदाजी करत हार्दिकला रोखलं.अखेरच्या षटकांमध्ये शार्दुल ठाकूर आणि आवेश खान यांच्या उत्कृष्ट गोलंदाजीमुळे ऋषभ पंतच्या नेतृत्वाखालील लखनौने मुंबईला २०४ धावांचे लक्ष्य गाठण्यापासून रोखले. याआधी मिचेल मार्श आणि एडन मारक्रम यांनी लखनौकडून उत्कृष्ट अर्धशतकं झळकावली होती. तर मधल्या षटकांमध्ये फिरकी गोलंदाज दिग्वेश राठीने मुंबईच्या फलंदाजांवर नियंत्रण ठेवले. लखनौने या सामन्यात प्रथम फलंदाजी करत मोठी धावसंख्या उभारली. पुन्हा एकदा सलामीवीर मिचेल मार्शने संघासाठी स्फोटक खेळी खेळली आणि अवघ्या २७ चेंडूत अर्धशतक झळकावले. मार्शने ३१ चेंडूत ६० धावा केल्या. यावेळी एडन मारक्रमच्या बॅटनेही काम केले आणि या सलामीवीराने मोसमातील पहिले अर्धशतक झळकावले. मात्र, यावेळी निकोलस पूरन अपयशी ठरला, तर कर्णधार पंत सलग चौथ्या सामन्यात फ्लॉप ठरला.सलामीवीरांनंतर मधल्या फळीत आयुष बडोनीने छोटी पण तुफानी खेळी खेळली, तर डेव्हिड मिलरने शेवटच्या षटकांमध्ये आक्रमक फलंदाजी करत संघाला २०० धावांच्या पुढे नेले. तर मुंबईसाठी कर्णधार हार्दिक पंड्याने गोलंदाजीत धुमाकूळ घातला आणि ४ षटकांत ३६ धावा देत ५ विकेट घेतले. हार्दिकने त्याच्या T20 कारकिर्दीत पहिल्यांदाच ५ विकेट घेतल्या. मुंबई इंडियन्सकडून या सामन्यात नवी सलामी जोडी उतरली होती. मुंबईची नवी सलामी जोडी अपयशी ठरली. रोहित शर्मा गुडघ्याच्या दुखापतीमुळे या सामन्यातून बाहेर पडला होता. त्यामुळे त्याच्या जागी आलेल्या विल जॅक्सला संधी होती पण तो अपयशी ठरला. संघाचे दोन्ही सलामीवीर केवळ १७ धावा करून पॅव्हेलियनमध्ये परतले होते. यानंतर नमन धीर आणि सूर्यकुमार यादव यांनी पलटवार केला आणि आक्रमक फलंदाजी केली.नमनने अवघ्या २४ चेंडूत ४६ धावा केल्या. तो बाद झाल्यानंतर सूर्यकुमार यादवने संघाची धुरा सांभाळली. सूर्यकुमारने फॉर्ममध्ये पुनरागमन सुरूच ठेवले आणि अनेक महिन्यांनंतर टी-२० क्रिकेटमधील पहिले अर्धशतक झळकावले. मात्र, तिलक वर्मा दुसऱ्या बाजूने संघर्ष करताना दिसला, त्यामुळे मुंबईच्या धावांना ब्रेक लागला. तिलक वर्माला अखेरच्या षटकांमध्ये रिटायर्ड हर्ट करण्यात आलं. १७ व्या षटकाच्या पहिल्या चेंडूवर आवेश खानने सूर्याची विकेट मिळवून मुंबईला मोठा धक्का दिला, पण कर्णधार हार्दिकने येताच काही मोठे फटके मारून आशा जिवंत ठेवल्या.

### मार्शने 31 चेंडूत 60 धावा केल्या

पण संघाला विजय मिळवून देण्यात तो कमी पडला. चौथ्या चेंडूवर मोठा फटका मारायला हार्दिक चुकला. पाचव्या चेंडूवर हार्दिकने एक धाव घेतली आणि सहाव्या चेंडूवर धाव मिळाली नाही. पहिल्या चेंडूवर षटकार बसलेला असतानाही आवेश खानने यॉर्कर टाकत उत्कृष्ट गोलंदाजी करत हार्दिकला रोखलं.अखेरच्या षटकांमध्ये शार्दुल ठाकूर आणि आवेश खान यांच्या उत्कृष्ट गोलंदाजीमुळे ऋषभ पंतच्या नेतृत्वाखालील लखनौने मुंबईला २०४ धावांचे लक्ष्य गाठण्यापासून रोखले. याआधी मिचेल मार्श आणि एडन मारक्रम यांनी लखनौकडून उत्कृष्ट अर्धशतकं झळकावली होती. तर मधल्या षटकांमध्ये फिरकी गोलंदाज दिग्वेश राठीने मुंबईच्या फलंदाजांवर नियंत्रण ठेवले.लखनौने या सामन्यात प्रथम फलंदाजी करत मोठी धावसंख्या उभारली. पुन्हा एकदा सलामीवीर मिचेल मार्शने संघासाठी स्फोटक खेळी खेळली आणि अवघ्या २७ चेंडूत अर्धशतक झळकावले. मार्शने ३१ चेंडूत ६० धावा केल्या.

# विघ्नेश पुथूरने सार्थ ठरवला विश्वास

## मास्टरमाईंड रोहितचा सल्ला अन् मुंबईने सामन्यात केलं पुनरागमन



। नवी दिल्ली ।
प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**मुंबई इंडियन्सचा आयपीएल २०२५ मधील चौथा सामना लखनौ सुपर जायंट्सविरूद्ध खेळवला जात आहे. या सामन्यात मुंबईने नाणेफेक जिंकत प्रथम गोलंदाजीचा निर्णय घेतला. पण लखनौच्या सलामीवीरांनी वादळी सुरूवात करत पॉवरप्लेमध्येच ६९ धावांचा टप्पा गाठला. मिचेल मार्श आणि एडन मारक्रमच्या जोडीने विस्फोटक सुरूवात केली. अखेरीस रोहित शर्माच्या एका युक्तीने संघाला पहिली विकेट मिळवून दिली.**

रोहित शर्मा मुंबई इंडियन्स वि. लखनौ सुपर जायंट्स सामन्यात प्लेईंग इलेव्हनचा भाग नाहीये. सामन्यापूर्वी सराव करताना रोहित शर्माच्या गुडघ्याला दुखापत झाल्याने तो संघाबाहेर आहे. तर रोहित शर्माच्या जागी नवा खेळाडू राज अंगद बावाला पदार्पणाची संधी मिळाली. पण फक्त ब्रेकमध्ये येऊन रोहित शर्माने दिलेल्या सल्ल्यामुळे संघाला पहिली विकेट मिळाली.पॉवरप्लेमध्ये लखनौच्या सलामीवीरांनी विस्फोटक खेळी केली. मिचेल मार्शने वादळी फलंदाजी करत संघाला ६ षटकांत ६९ धावांचा टप्पा गाठून दिला. बोल्टची २ षटकं, चहर,सँटनरचं १-१ षटक, सँटनर, तर अश्वनी कुमारची २ षटकं मुंबईकडून टाकण्यात आली. पण मार्शने प्रत्येक चेंडूवर वादळी फटकेबाजी केली आणि पॉवरप्लेमध्ये २७ चेंडूत आपलं अर्धशतक पूर्ण केलं. यानंतर पॉवरप्लेनंतर स्ट्रॅटेजिक टाईम आऊट घेण्यात आला.टाईमआऊटमध्ये रोहित शर्माही मैदानावर आला होता. रोहितने हार्दिकला हातवारे करत फिरकीपटूला आणण्याचा सल्ला दिला. हार्दिकने लगेच रोहितचं ऐकलं आणि विघ्नेश पुथूरला सातवे षटक टाकायला दिले. विघ्नेश चांगली सुरूवात करत पहिल्या तिन्ही चेंडूवर एकही धाव दिली नाही. पण मारक्रमने चौथ्या चेंडूवर त्याला षटकार लगावला, पाचव्या चेंडूवर मारक्रमने एक धाव काढली आणि ६० धावा करून मैदानात असलेल्या मार्शला स्ट्राईक दिली.विघ्नेशने षटकातील अखेरचा चेंडू स्लोअर बॉल टाकला आणि मार्शने समोरच्या दिशेने फटका खेळला. विघ्नेशने चेंडूवर लक्ष ठेवत समोरच्या दिशेन येणार चेंडू उत्कृष्टपणे टिपला आणि संघाला महत्त्वाचा ब्रेकथ्रू मिळवून दिला. विघ्नेशने विकेट मिळवलेली पाहताच डगआऊटमध्ये बसलेल्या रोहित शर्माने टाळ्या वाजवत त्याचे कौतुक केलं.

### रोहित शर्माच्या गुडघ्याला दुखापत

पहिल्या विकेटनंतर रोहित शर्माची प्रतिक्रिया व्हायरल होत आहे. तर रोहितने मैदानावर येऊन दिलेला सल्लाही त्याचा व्हीडिओ व्हायरल होत आहे.रोहित शर्मा मुंबई इंडियन्स वि. लखनौ सुपर जायंट्स सामन्यात प्लेईंग इलेव्हनचा भाग नाहीये. सामन्यापूर्वी सराव करताना रोहित शर्माच्या गुडघ्याला दुखापत झाल्याने तो संघाबाहेर आहे.

स्मार्ट PCMC
SMART CITY
महाईन्यूज ™
ePaper
epaper.mahaenews.com
। शनिवार ।
। दि. 5 एप्रिल 2025।
पिंपरी-चिंचवड, मावळ आवृत्ती

## पगारवाढीचा ‘लेव्ही’सह 23 टक्के करार

# माथाडी कामगारांना घसघशीत वेतनवाढ!

### करारामुळे माथाडी कामगारांचे जीवनमान सक्षम होणार – इरफान सय्यद

। पिंपरी- चिंचवड । प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**असोसिएशन ऑफ ट्रान्सपोर्ट, पुणे आणि महाराष्ट्र मजदूर संघटना यांच्यात नुकताच माथाडी कामगारांच्या पगारवाढीचा ‘लेव्ही’सह 23 टक्के करार संपन्न झाला. हा करार जानेवारी 2025 पासून लागू झाला असून, कराराची मुदत तीन वर्ष आहे. या करारामुळे नक्कीच माथाडी कामगारांचे जीवनमान सक्षम होण्यास मदत होणार आहे, असे प्रतिपादन मजदूर संघटनेचे अध्यक्ष, कामगार तथा शिवसेना उपनेते इरफान सय्यद यांनी केले आहे.**



निगडी येथील असोसिएशन ऑफ ट्रान्सपोर्टच्या कार्यालयात इरफानभाई सय्यद यांच्या नेतृत्वाखाली असोसिएशन ऑफ ट्रान्सपोर्टचे अध्यक्ष डॉ. दिलीप देशमुख, उपाध्यक्ष सुमित धुमाळ, जन.सेक्रेटरी अनुप जैन, खजिनदार - सतनामसिंग संधू, कार्याध्यक्ष गौरव कदम, माजी अध्यक्ष तथा सदस्य प्रमोद भावसार, माजी वरिष्ठ उपाध्यक्ष अशोक काळे, अध्यक्ष लीगल कमिटी तथा सहप्रतिनिधी दिल्ली अनिलकुमार शर्मा, ट्रस्टी जगराम चौधरी, संजय बारसे, सह खजिनदार सुभाष शर्मा, सह खजिनदार सुभाष शर्मा, सदस्य राजकुमार फडतरे, तेजस ढेरे, के.सी.शर्मा, के.पी.सिंग, आर.के. गुप्ता, विनोदजी जगजंपी, रोहतास चौधरी, सुनील कौशिक, नितीन जाधव, सुभाष धायल, रविंद्र शर्मा, प्रदीप नलावडे, आणि महाराष्ट्र मजदूर संघटनेच्या पदाधिकारी यांनी वेतन करारावर स्वाक्ष-या केल्या. या करारामुळे कामगारांच्या पगारात घसघशीत वाढ होणार आहे. पिंपरी चिंचवड बोर्डातील सर्व कामगारांना याचा फायदा होणार आहे. त्यामुळे कामगारांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे.

#### कामगारांचे हित जोपासण्यासाठी आमची संघटना कटिबध्द

इरफान सय्यद म्हणाले, कामगार व उद्योजक हे एकमेकांवर अवलंबून असतात. कामगारांना कंपनी व्यवस्थापनाचे नेहमीच सहकार्य असते. दोघांमधील दुवा म्हणून महाराष्ट्र मजदूर संघटना काम करीत असते. यापुढील काळातही कामगार व प्रशासन यांनी एकत्रित राहून कंपनी व कामगारांचे हित जोपासण्यासाठी आमची संघटना कटिबध्द आहे.

#### वाहतूकदार आणि कामगार या दोघात समतोल असणे गरजेचा

असोसिएशन ऑफ ट्रान्सपोर्ट चे अध्यक्ष डॉ. दिलीप देशमुख म्हणाले की सौदर्हपूर्वक खेळीमेळीच्या वातावरणात करार संपूष्टात आल्याने कामगार आणि असोसिएशन चे एक्य या कराराने दिसून आले आहे पुढील काळात देखील हे दोन्हीही घटक एकमेकांच्या सहयोगाने आप-आपला विकास साधतील यात शंका नाही. हे वाहतूकदार आणि कामगार हे दोन्हीही घटक उद्योगाची दोन सक्षम चाके आहेत. तेंव्हा या दोघात समतोल असणे गरजेचे आहे.

> “ अनेक वर्षांतील हा सर्वांत मोठा वेतनवाढ करार आहे. औद्योगिक शांतता जपत आणि अत्यंत खेळीमेळीच्या वातावरणात हा वेतनवाढ करार संपन्न झाला. असोसिएशन ऑफ ट्रान्सपोर्ट पुणे यांनी आमच्या सर्व मागण्या मान्य केल्या. दोन आठवड्यातच हा करार संपन्न आहे. त्याबाबत संघटनेच्या वतीने ट्रान्सपोर्ट असोसिएशनचा मी आभारी आहे. कराराची प्रत औद्योगिक कंपन्यांना देण्याची व्यवस्था देखील करण्यात येणार आहे. ”
>
> **–इरफान.सय्यद,** कामगार तथा शिवसेना उपनेते

## आर्टिफिशियल इंटेलिजन्स” आपलास्मार्ट सहकारी – आयुक्त शेखर सिंह

### महापालिकेच्या अधिकाऱ्यांना कृत्रिम बुद्धिमत्ता वापराचे प्रशिक्षण

। पिंपरी-चिंचवड । प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**आर्टिफिशियल इंटेलिजन्स (एआय) तंत्रज्ञानाविषयी सध्या समाजमाध्यमांवर अनेक सकारात्मक आणि नकारात्मक मतप्रवाह दिसत आहेत. मात्र, आता हे तंत्रज्ञान केवळ भविष्यातील कल्पना न राहता, प्रत्यक्ष प्रशासकीय कामकाजाचा एक आवश्यक भाग बनत आहे.**



हे संकट नव्हे, तर तो आपला स्मार्ट सहकारी आहे. कार्यालयीन कामकाज अधिक जलद, सुलभ आणि अचूक होण्यासाठी प्रत्येकाने तंत्रज्ञानस्नेही होणे ही काळाची गरज आहे. आर्टिफिशियल इंटेलिजन्सच्या माध्यमातून गुणवत्ता आणि परिणामकारकता निश्चितच वाढवू शकतो. तंत्रज्ञानाबद्दलचे गैरसमज दूर करून, त्याची अचूक समज घेतल्यास ते आपल्याला अधिक सक्षम बनवू शकते, असे मत आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांनी व्यक्त केले.

राज्य शासनाच्या १०० दिवसीय विशेष उपक्रमांतर्गत पिंपरी चिंचवड महापालिकेच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांना ‘कृत्रिम बुद्धिमत्ता आणि सुयोग्य माहिती तंत्रज्ञानाचा प्रशासनातील प्रभावी वापर’ या विषयावर आधारित सखोल प्रशिक्षण देण्यात आले, यावेळी आयुक्त शेखर सिंह बोलत होते.

#### यांची प्रामुख्याने उपस्थिती...

पिंपरी चिंचवड महापालिकेच्या मुख्य प्रशासकीय इमारतीतील दिवंगत महापौर मधुकरराव पवळे सभागृहात पार पडलेल्या या प्रशिक्षणादरम्यान मुख्य अभियंता संजय कुलकर्णी, मुख्य माहिती व तंत्रज्ञान अधिकारी निळकंठ पोमण, उप आयुक्त विठ्ठल जोशी, मनोज लोणकर, अण्णा बोदडे, संदीप खोत, सचिन पवार, जनता संपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक तसेच कार्यकारी अभियंता आणि विभागप्रमुख उपस्थित होते.

# Moaraya Shikshan Sanstha Computer Vacation Batch 2024-25




## Second Batch

From 5th April 2025

Duration One Month

1 Hour /day

Monday to Saturday

For
10th std Students,
12th std students,
parents,
others school students

'C' Language
Fees: 1300/-

Corel Draw
Fees: 1100/-

'C++' Language
Fees: 1300/-

Adobe Photoshop
Fees : 1100/-



Basic Java
Fees : 1300/-

Basic Tally
Fees : 1500

Scratch Animation
Fees : 1300/-

M.S. Office
Fees : 1500/-

Contact: 8087706100/ Computer Lab

Registration started

Venue: Computer Lab, V. K. Mate Highschool

Priyadarshani
SCHOOL & JR. COLLEGE
ALANDI

2025-26
# ADMISSIONS
OPEN

## PRIYADARSHANI
SCHOOL, ALANDI

**42** YEARS OF ENRICHING EXPERIENCE IN EDUCATION

**50** FIFTY PLUS NATIONAL & INTERNATIONAL AWARDS ACROSS SCHOOLS

Contact Us Now

**86687 55826**

**98232 31705**

Wadgoan road, Sr.no. 98,
Opposite Ram Mandir,
Alandi 412105




Late Babanrao Gabaji Gawali Charitable Trust's
SPG INTERNATIONAL PUBLIC SCHOOL & JUNIOR COLLEGE
Powered by
JAI HIND EDUTECH
CBSE Affiliation No. : 1130741 • UDISE Code - 27252001012
BHOSARI CAMPUS : Sr. No. 203, Nr. Durwankur Lawns, Alandi Road, Bhosari, Pune-411039 (Maharashtra)
ADMISSION
OPEN
2025-2026
Pre Primary to Class XII
LIMITED SEATS
Hurry up!!!
Bi-focal / Technical / Vocational Subject are available
For Science Stream
• Computer Science
• Crop Science
• Electronics
• Mechanical / Technical Automobile
• Information Technology (IT)
For Commerce Stream
• Banking
• Marketing & Sales
• Office Management
• Small Industries & Self employment
• Information Technology (IT)
CALL NOW : 9763441639 / 8657473241